# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेत ठराव 31 दि. 12/04/1976 नुसार पदोन्नती
**{सामान्य प्रशासन विभाग}** धोरण अंमलात होते. तसेच सन 2016 मध्ये सुधारीत आकृती बंद तयार करण्यात येवून मनपा ठराव क. 376 दि. 01/12/2016 अन्वये महासभेने मंजूरी प्रदान केलेली असून शासनास दि 04/02/2017 रोजी आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम मंजूरीकरीता पाठविण्यांत आला असता त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या आकृतीबंधास महाराष्ट्र शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक नामपा-1223/प्र.क्र. 71/नवि-26, दिनांक 10 मे 2023 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच शासन निर्णय 08.12.2023 अन्वये सेवाप्रवेश नियमास सुध्दा मंजुरी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त आकृतीबंधात "प्रपत्र-ई" मध्ये व्यपगत केलेल्या यादीमध्ये कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क या पदांचा समावेश असुन या पदावर अनुक्रमे ३-३ कर्मचारी कार्यरत आहे. हे पद व्यपगत केल्यामुळे या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पूढील पदोन्नतीची संधी उपलब्ध होणार नाही. या पदांना जुन्या सेवाप्रवेश नियमामध्ये उच्च श्रेणी लिपीक हे पदोन्नतीचे पद होते. उच्च श्रेणी लिपीक या पदावर "कनिष्ठ लिपीक, प्रयोगशाळा सहायक, टेलिफोन क्लर्क, कॉम्युटर क्लर्क, पी.बी.एक्स. ऑपरेटर या पदामधुन पदोन्नती देण्यात येत होती." नविन सेवाप्रवेश नियमात कनिष्ठ लिपीक, प्रयोगशाळा सहायक, व पी.बी. एक्स ऑपरेटर ही पदे जशीच्या तशी ठेवण्यांत आली असुन कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क ही पदे व्यपगत करण्यात आलेली आहे.

करीता आकृतीबंधात कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क हे पद जरी व्यपगत केले असले तरी त्यांना सुधारीत सेवाप्रवेश नियमात जर ते पद व्यपगत केल्या गेले नसते तर त्या पदांना पदोन्नतीचे पद उपलब्ध राहीले असते. कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क या पदाची वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० असुन कनिष्ठ लिपीक या पदाचा वेतनश्रेणी देखोल रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० ही आहे. तसेच या दोन्ही पदाची शैक्षणीक अर्हता देखील समान असून हि शैक्षणीक अर्हता कनिष्ठ लिपीक पदाशी समतुल्य आहे. महाराष्ट्र मनपा अधिनियम चे कलम ५६ नुसार एका पदाचे वेतनश्रेणीतील किमान व कमाल वेतन दूसऱ्या पदासारखे असेल, तर ती दोन्ही पदे समतुल्य आहेत असे मानले जाईल, असे देखील नमूद आहे.

करीता कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना समान वेतनश्रेणीतील व समान शैक्षणिक पात्रतेच्या "कनिष्ठ लिपीक" या संवर्गात समान वेतनश्रेणीत जुनी सेवाजेष्ठता कायम ठेवून सामावून घेतल्यास त्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध होवू शकेल.

करीता कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क हे पद "कनिष्ठ लिपीक" या पदामध्ये सामावून घेणे/समायोजीत करुन घेणेबाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय:- नामपा-१२२३/प्रक्र.७१/नवी-२६ दिनांक १० मे २०२३ रोजीच्या आकृतीबंध प्रपत्र "क" मध्ये सुधारणा करुन कनिष्ठ लिपीक या पदामध्ये कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क ही पदे समायोजित करण्यास शासनाची मान्यता घेण्यास्तव मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- सविस्तर टिपणी व कागदपत्रे नस्तीत उपलब्ध आहेत.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 68/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 20/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेत ठराव 31 दि. 12/04/1976 नुसार पदोन्नती धोरण अंमलात होते. तसेच सन 2016 मध्ये सुधारीत आकृती बंद तयार करण्यात येवून मनपा ठराव क. 376 दि. 01/12/2016 अन्वये महासभेने मंजूरी प्रदान केलेली असून शासनास दि 04/02/2017 रोजी आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम मंजूरीकरीता

पाठविण्यांत आला असता त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेच्या आकृतीबंधास महाराष्ट्र शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक नामपा- 1223/प्र.क्र. 71/नवि-26, दिनांक 10 मे 2023 रोजी मंजूरी प्रदान केलेली आहे. तसेच शासन निर्णय 08.12.2023 अन्वये सेवाप्रवेश नियमास सुध्दा मंजुरी प्राप्त झालेली आहे.

उपरोक्त आकृतीबंधात "प्रपत्र-ई" मध्ये व्यपगत केलेल्या यादीमध्ये कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क या पदांचा समावेश असुन या पदावर अनुक्रमे ३-३ कर्मचारी कार्यरत आहे. हे पद व्यपगत केल्यामुळे या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पूढील पदोन्नतीची संधी उपलब्ध होणार नाही. या पदांना जुन्या सेवाप्रवेश नियमामध्ये उच्च श्रेणी लिपीक हे पदोन्नतीचे पद होते. उच्च श्रेणी लिपीक या पदावर "कनिष्ठ लिपीक, प्रयोगशाळा सहायक, टेलिफोन क्लर्क, कॉम्प्युटर क्लर्क, पी.बी.एक्स. ऑपरेटर या पदामधुन पदोन्नती देण्यात येत होती." नविन सेवाप्रवेश नियमात कनिष्ठ लिपीक, प्रयोगशाळा सहायक, व पी.बी. एक्स ऑपरेटर ही पदे जशीच्या तशी ठेवण्यांत आली असुन कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क ही पदे व्यपगत करण्यात आलेली आहे.

करीता आकृतीबंधात कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क हे पद जरी व्यपगत केले असले तरी त्यांना सुधारीत सेवाप्रवेश नियमात जर ते पद व्यपगत केल्या गेले नसते तर त्या पदांना पदोन्नतीचे पद उपलब्ध राहीले असते. कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क या पदाची वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० असुन कनिष्ठ लिपीक या पदाचा वेतनश्रेणी देखोल रु. ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० ही आहे. तसेच या दोन्ही पदाची शैक्षणीक अर्हता देखील समान असून हि शैक्षणीक अर्हता कनिष्ठ लिपीक पदाशी समतुल्य आहे. महाराष्ट्र मनपा अधिनियम चे कलम ५६ नुसार एका पदाचे वेतनश्रेणीतील किमान व कमाल वेतन दूसऱ्या पदासारखे असेल, तर ती दोन्ही पदे समतुल्य आहेत असे मानले जाईल, असे देखील नमूद आहे.

करीता कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना समान वेतनश्रेणीतील व समान शैक्षणिक पात्रतेच्या "कनिष्ठ लिपीक" या संवर्गात समान वेतनश्रेणीत जुनी सेवाजेष्ठता कायम ठेवून सामावून घेतल्यास त्यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध होवू शकेल.

करीता कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क हे पद "कनिष्ठ लिपीक" या पदामध्ये सामावून घेणे/समायोजीत करुन घेणेबाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय:- नामपा-१२२३/प्रक्र.७१/नवी-२६ दिनांक १० मे २०२३ रोजीच्या आकृतीबंध प्रपत्र "क" मध्ये सुधारणा करुन कनिष्ठ लिपीक या पदामध्ये कॉम्प्युटर क्लर्क व टेलिफोन क्लर्क ही पदे समायोजित करण्यास शासनाची मान्यता घेण्यास्तव  मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**